<u>(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)</u>

(१९७१) १ एस. सी. अार ७४८

राज कुमार सिंग हुकुम चंदजी

विरुद्ध

आयकर आयुक्त मध्य प्रदेश

११ ऑगस्ट १९७०

[न्या. सी. शाह, न्या. के. एस. हेगडे आणि न्या. ए. एन. ग्रोव्हर]

भारतीय आयकर अधिनियम (१९२२ चा ११वा) - व्यवस्थापन संचालक म्हणून मिळणारा मोबदला - ते वैयक्तिक उत्पन्न किंवा हिंदू अविभाजित कुटुंबाचे उत्पन्न म्हणून आकारणीयोग्य आहे का.

कंपनीचे कर्मचारी व्यवस्थापन चालवणाऱ्या एका हिंदू अविभाजित कुटुंबाचे ३ शाखांमध्ये विभाजन झाले, त्यापैकी एक करपात्र व्यक्तिचे आहे आणि कंपनीचे शेअर्स त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर अधिक होते. त्यानंतरच्या या सर्व अधिग्रहणांचा मोबदला हा हिंदू अविभाजित कौटुंबिक निधीतून करण्यात आला. सर्व शेअर्स - पूर्वीचे आणि नंतरचे अधिग्रहण केलेले, कुटुंबाच्या हिशोबी पुस्तकात आणि ताळेबंदामध्ये कुटुंबाची संपत्ती म्हणून मांडले गेले आणि त्याचे लाभांश देखील कुटुंबाच्या खात्यात जमा केले गेले. कंपनीचे व्यवस्थापन संचालक म्हणून करपात्र व्यक्तीला विशिष्ट मोबदला मिळत असे. करपात्र व्यक्तीला मिळणारे व्यवस्थापकीय संचालकाचे मानधन त्याचे वैयक्तिक मानले जाईल कि करपात्र व्यक्तीच्या हिंदू अविभाजित कुटुंबाच्या मानले जाईल, या प्रश्नावर, या न्यायालयाचा-

निर्णय: मोबदल्याची अाकारणी करदात्याचे वैयक्तिक उत्पन्न म्हणून केली जाईल, त्याच्या हिंदू अविभाजित कुटुंबाचे उत्पन्न म्हणून नाही.

अशा प्रकरणांमध्ये लागू केले जाणारे व्यापक तत्त्व असे आहे की, सहदायादाने प्राप्त केलेला मोबदला स्वरूपात नसला तरी ते व्यवसायातील कुटुंबाच्या निधीची एक गुंतवणूक होती की वैयक्तिक सहदायादाने दिलेल्या सेवांसाठी केलेली भरपाई होती.

जर ते पहिलेचे असेल तर ते हिंदू अविभाजित कुटुंबाचे उत्पन्न आहे परंतु जर ते दुसरे असेल तर ते वैयक्तिक सहदायादाचे उत्पन्न आहे. जर उत्पन्न मूलतः गुंतवलेल्या निधींच्या परिणामस्वरूप कमावले गेले असेल तर सहदायादाने काही सेवा दिली हे तथ्य, प्राप्तीचे स्वरूप बदलणार नाही. परंतु दुसरीकडे जर ते सहदायादाने केलेल्या सेवेसाठी मूलतः मोबदला असेल तर त्याच्या सेवेचा लाभ घेतला होता कारण तो त्या व्यवसायात निधी गुंतवणाऱ्या कुटुंबाचा सदस्य आहे किंवा त्याने कौटुंबिक निधीतून पात्रता शेअर मिळवले होते, त्यामुळे ती पावती म्हणजे हिंदू अविभाजित कुटुंबाचे उत्पन्न होणार नाही. [७५९ डी]

या प्रकरणात न्यायाधिकारणाने आढळलेल्या तथ्यांशी वर नमूद केलेल्या चाचण्या लागू करताना, विचाराधीन उत्पन्न करपात्र व्यक्तीचे वैयक्तिक उत्पन्न होते याबद्दल शंका घेण्यासाठी कोणतीही जागा नाही. त्याच्या कुटुंबाने फर्ममध्ये मोठ्या प्रमाणात शेअर्स खरेदी केले या केवळ कारणास्तव ते फर्मचा व्यवस्थापकीय संचालक झाले नाही. संचालक मंडळाने त्यांची व्यवस्थापन संचालक म्हणून निवड केली. न्यायाधिकरणाने असा निष्कर्ष काढला आहे की त्याला त्याच्या वैयक्तिक सेवेसाठी पगार मिळाला. कुटुंबाच्या वतीने त्याची व्यवस्थापकीय संचालक म्हणून निवड झाली होती हे सांगण्यासाठी कोणताही पुरावा नाही. पूर्वी त्यांना मिळणारा पगार त्यांचे वैयक्तिक उत्पन्न म्हणून करयोग्य होता. अन्य व्यवस्थापकीय संचालकांना मिळणाऱ्या पगाराच्या बाबतीतही अशीच परिस्थिती होती. न्यायाधिकरणाने असा निष्कर्ष काढला आहे की त्याची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती कुटुंबाच्या मालमत्तेच्या कोणत्याही परिव्यय किंवा खर्चाचा किंवा हानीचा परिणाम म्हणून झाली नाही. व्यवस्थापकीय संचालकपद हे वैयक्तिक जबाबदारी आणि क्षमतेचे एक काम आहे असा निष्कर्षही त्यांनी काढला आहे. [७५९ जी]

आयकर आयुक्त, पश्चिम बंगाल -विरुद्ध- कालू बाबू लाल चंद; ३७ आय. टी. आर. १२३; मथुरा प्रसाद -विरुद्ध - आयकर आयुक्त ६० आय. टी. आर. ४२८, पियरे लाल अधिश्वर लाल -विरुद्ध - आयकर आयुक्त, ४० आय. टी. आर. १७; व्ही. डी.

धनवते - विरुद्ध - आयकर आयुक्त एम. पी. ६८, आय. टी. आर. ३६५; एम. डी. धनवते - विरुद्ध - आयकर आयुक्त एम. पी. ६८, आय. टी. आर. ३८५; एस. आर. एम. सी. टी. पीएल. पलनियप्पा चेट्टियार – विरुद्ध - आयकर आयुक्त, मद्रास ६८, आय. टी. आर. २२१; आयकर आयुक्त, म्हैसूर – विरुद्ध - गुरुनाथ ढाकप्पा, ७२ आय. टी. आर. १९२, पी. एन. कृष्णा अय्यर -विरुद्ध - आयकर आयुक्त, केरळ, ७३ आय. टी. आर. ५३९ आणि आयकर आयुक्त, म्हैसूर – विरुद्ध - डी. सी. शाह, ७३, आय. टी. आर. ६९२ हे स्पष्ट केले.

गोकुल चंद -विरुद्ध- हुकुम चंद नाथ मल, ४८, आय. ए., १६२ यामध्ये दिलेले तत्त्व आता वैध राहिले नाही.

दिवाणी अपील अधिकारिता : १९६७ चा दिवाणी अपील क्रमांक ३२६ आणि ३२७

१९६३ चे किरकोळ दिवाणी प्रकरण क्र. १८६ आणि १९६४ चे किरकोळ दिवाणी प्रकरण क्र. ३९ मधील दिनांक ३ मे १९६३ चा निर्णय आणि आदेशविरुद्ध अपील.

एम. सी. छागला, अशोक चितळे आणि रामेश्वर नाथ, अपीलकर्त्यासाठी (दोन्ही अपीलांमध्ये).

एस. सी. मनचंदा, जी. एस. शर्मा, आर. एन. साठये आणि बी. डी. शर्मा. उत्तरवादीसाठी (दोन्ही अपीलांमध्ये)

न्यायालयाचा न्यायनिर्णय **न्या. हेगडे** यांनी पारित केला

भारतीय आयकर अधिनियम, १९२२ (हयानंतर अधिनियम म्हणून संबोधला जाईल) च्या कलम ६६अ (२) अंतर्गत प्रमाणपत्रान्वये दाखल या अपिलांमध्ये निर्णयासाठी उद्भवणारा प्रश्न असा आहे:

> "या प्रकरणातील तथ्य आणि परिस्थिती लक्षात घेता, श्री. राजकुमार सिंग यांना मिळणारे व्यवस्थापकीय संचालकांचे मोबदला हे व्यक्तिगतरीत्या आकारणीयोग्य होते आणि नाही की ते करपात्र हिंदू अविभाजित कुटुंबाचे होते?”

हा प्रश्न आयकर अपीलीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ 'अ' यांनी आयकर आयुक्त, मध्य प्रदेश यांनी अधिनियमाच्या कलम ६(१) अंतर्गत केलेल्या अर्जानुसार मुंबई उच्च न्यायालयाकडे पाठविला होता. उच्च न्यायालयाने हा प्रश्न महसूलाच्या बाजूने दिलेला आहे. त्या निर्णयाविरुद्ध हे अपील दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणातील करपात्र हे हिंदू अविभाजित कुटुंब आहे आणि संबंधीत आकारणी वर्ष १९५४–५५ आहे, संबंधित लेखा कालावधी हा दिवाळी १९५३ म्हणजे ६ नोव्हेंबर १९५३ रोजी संपणारे वर्ष आहे. पूर्वी हे हिंदू अविभाजित कुटुंब "सरुपचंद हुकमचंद" या नावाने आणि शैलीने व्यवसाय करत होते. त्या कुटुंबाकडे अनेक व्यवसाय होते, त्यापैकी एक म्हणजे गिरणींचे व्यवस्थापन हे होते. ते कुटुंब ३० मार्च १९५० रोजी विभाजित झाली. करपात्र व्यक्ति हा हिंदू अविभाजित कुटुंबाचा सदस्य आहे. ३१ मार्च १९५० रोजी सरुपचंद हुकमचंद खासगी मर्यादित या नावाने आणि शैलीने एक कंपनी स्थापन करण्यात आली. कंपनीची भांडवली रचना रु. ५ कोटीची होती, जी रु. १,००० प्रत्येकी प्रमाणे २०,००० प्राधान्य शेअर्स आणि रु. १,००० प्रत्येकी प्रमाणे ३,००० साधारण शेअर्समध्ये विभागली होती. कंपनीची स्थापना मेसर्स सरुपचंद हुकमचंदकडून काही व्यवस्थापकीय संस्था, व्यवसाय, कारखाने आणि मालमत्ता अधिग्रहित करण्यासाठी आणि त्या हेतूसाठी सदर संस्थेसोबत करार करण्यासाठी आणि राजकुमार मिल्स मर्यादित, हुकमचंद मिल्स मर्यादित आणि हिरा मिल्स मर्यादितचे व्यवस्थापकीय अभिकर्ता म्हणून व्यवसाय करण्यासाठी आणि कंपनीच्या संस्थापन समयलेखात अधिक विशिष्टरीत्या उल्लेख केलेल्या इतर व्यवसाय करण्यासाठी करण्यात आली. कंपनीचे पहिले संचालक खालीलप्रमाणे होते:

(१) सर हुकमचंद सरूपचंदजी

(२) राजकुमारसिंह हुकमचंदजी

(३) लेडी कांचनाबाई हुकमचंदजी

(४) श्रीमती प्रेमकुमारीदेवी राजकुमारसिंहजी

(५) राजा बहादुरसिंह राजकुमारसिंहजी

(६) रुस्तमजी कावसजी जाल.

नियम ५३ अंतर्गत संचालकासाठी निर्धारित पात्रता ही कंपनीमध्ये किमान १० शेअर्स धारणेची होती, मग ते प्राधान्य किंवा सामान्य किंवा अंशतः प्राधान्य किंवा अंशतः सामान्य असले तरी चालेल. नियम ५५ मध्ये तरतूद करण्यात आली होती की, संचालक वेळोवेळी त्यांच्यापैकी एक किंवा अधिक सदस्यांना व्यवस्थापकीय संचालक किंवा व्यवस्थापक या पदावर नियुक्त करू शकतात, अशा अटींवर आणि अशा मानधनावर जे संचालकांनी निश्चित केले पाहिजे. नियम ५५ अंतर्गत त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचे अनुसरण करून, संचालकांनी त्यांच्या ३१ मार्च १९५०च्या ठरावाद्वारे कंपनीच्या व्यवसायाच्या व्यवस्थापनासाठी सर हुकमचंद राजबहादुर, राजकुमार आणि राजबहादुर यांना कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त केले, त्या कामासाठी रु. ५,०००/- प्रति महिना मानधन देणे ठरवले. नियम ६३ अंतर्गत, कंपनीच्या व्यवस्थापनासाठी संचालकांना काही अधिकार देण्यात आले होते. ते संचालक मंडळाच्या नियंत्रणाखाली होते. मूळ हिंदू अविभाजित कुटुंबाच्या तीन शाखा म्हणजेच सर सेठ हुकमचंद, लेडी कांचनबाई आणि श्री राजकुमारसिंह यांच्या शाखांना रु. १,००० प्रत्येकी असे दर्शनी मूल्य असलेले ५,००० शेअर्स देण्यात आले. करपात्र व्यक्तीच्या शाखेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कर्त्याला ५,००० शेअर्स मिळाले. राजकुमारने त्याच्या पत्नी प्रेमकुमारीच्या नावावर ३० शेअर्स आणि राजबहादुरच्या नावावर १० शेअर्स विकत घेतले. या सर्व नंतरच्या अधिग्रहणाचा मोबदला हिंदू अविभाजित कुटुंब निधीमधून केला गेला. सर्व ५,०३० शेअर्स करपात्र कुटुंबाच्या हिशोबी पुस्तकात आणि ताळेबंदामध्ये त्याच्या मालमत्तेप्रमाणेच मानण्यात आला. या शेअर्सच्या लाभांशदेखील कुटुंबाच्या खात्यात जमा करण्यात आले. सर हुकमचंद यांचे निधन झाले आणि त्यांच्या निधनानंतर इतर दोघे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम करत राहिले. १९५१-५२, १९५२-५३ आणि १९५३-५४ या वर्षांसाठी, व्यवस्थापकीय संचालकांच्या मानधनापोटी प्राप्त झालेले रु. ५,०००/- प्रति महिना एवढी रक्कम राजकुमारचे व्यक्तीगत उत्पन्न म्हणून मानण्यात आले आणि त्या

आधारावर अाकारणी करण्यात आली. त्याचप्रमाणे सर हुकमचंद आणि राजबहादुर यांनी प्राप्त केलेले मानधन त्यांचे व्यक्तीगत उत्पन्न म्हणून आकारण्यात आले आहे आणि ते आकारले जात आहे. वर्ष १९५४-५५ मध्ये करपात्र व्यक्तीला आकारणी करताना, आयकर अधिकाऱ्यांनी या बाबीचा उल्लेख खालील शब्दांत केला:

> "व्यवस्थापकीय संचालकांच्या मानधनातून आणि संचालक फीमधून उत्पन्न व्यक्तीगतरित्या करयोग्य आहे असा दावा करण्यात आला होता. जसे पूर्वीच्या आकारणीमध्ये करण्यात आले होते."

या कारणास्तव त्यांनी रक्कम रु. ६०,००० चे मूल्यांकन केले नाही आणि खाते वर्ष १९५४-५५ शी संबंधित आकारणी वर्षासाठी राजकुमारने प्राप्त केले बैठकीचे शुल्क रु. १,४२०/- हिंदू अविभाजित कुटुंबाच्या नाही, परंतु राजकुमाराचे वैयक्तिक म्हणून आकारण्यात आले. १० जानेवारी १९६१ रोजी, आयकर आयुक्तांनी कलम ३३ (बी) अंतर्गत आपल्या अधिकाराचा वापर करून, करपात्र व्यक्तिची आकारणी वर्ष १९५४-५५ वर्षासाठीच्या आकारणीत उत्पन्न रु. ६०,०००/- अधिक रु. १,४२०/-ची रक्कम करपात्र हिंदू अविभाजित कुटुंबाची ज्याचा राजकुमार कर्ता होता त्यांची समजून सुधारणा का केली जाऊ नये याचे कारण दाखविण्यासाठी करपात्र व्यक्तीला नोटीस बजावली. करपात्राने त्या नोटीसला विरोध केला. त्यांनी प्रश्नार्थक रक्कम त्यांच्या व्यक्तीगत उत्पन्न आहे असा दावा केला. आयुक्तांनी करपात्रांचा युक्तिवाद स्वीकारला नाही आणि आयकर आयुक्त, पश्चिम बंगाल -विरुद्ध - कालू बाबू लालचंद ([1]) या प्रकरणातील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर असे मत व्यक्त केले की, ते उत्पन्न करपात्रांचे होते. त्याने त्यानुसार करपात्रांवर कर आकारला. त्या निर्णयाने व्यथित होऊन, करपात्राने आयकर अपीलीय न्यायाधिकरणाकडे अपील केले. न्यायाधिकरणाकडे, करपात्रांच्या वकिलांनी रु. १,४२०/- बैठक शुल्क हे करपात्राच्या उत्पन्न मानले जाऊ शकते असे मान्य केले. त्यामुळे वाद रु. ६०,०००/- पगारापोटी राजकुमारने प्राप्त केलेल्या रकमेवर केंद्रित होता. न्यायाधिकरणाने करपात्रांचा

---

1. ३७ आय. आय. टी. आर १२३

युक्तिवाद कायम ठेवला. राजकुमार संचालक असलेल्या खाजगी मर्यादित कंपनीचा इतिहास आणि पूर्वीचे मूल्यमापन कसे करण्यात आले याचा मागोवा घेतल्यानंतर न्यायाधिकरणाने असे निरीक्षण केले कि:

> "वरील तथ्यांवरून स्पष्ट आहे की, हा एकाच व्यवहाराचा किंवा व्यवस्थेच्या योजनेचा भाग नाही. मोठ्या हिंदू अविभाजित कुटुंबाबद्दल काहीही म्हटले जाऊ शकते, परंतु लहान हिंदू अविभाजित कुटुंबाला हे शेअर्स मिळाले हा शुद्ध योगायोग होता. राजकुमार आणि राजबहादुर दोघेही एकाच शाखेचे आहेत आणि दोघेही व्यवस्थापकीय संचालक आहेत. व्यवस्थापकीय संचालकांची नियुक्ती संचालक मंडळाच्या ठरावाद्वारे करण्यात आली होती आणि ते कोणत्याही वेळी संचालकांकडून काढून टाकू शकत होते. व्यवस्थापकीय संचालकाची नियुक्ती राजकुमार किंवा राजबहादुर यांनी हे शेअर्स मिळवल्यावर अवलंबून नव्हती. मोठे हिंदू अविभाजित कुटुंब विभाजित झाल्यानंतर लहान हिंदू अविभाजित कुटुंबाला काही शेअर्स मिळाले. संचालक फीबद्दल काहीही म्हटले जाऊ शकते, ते आता हिंदू अविभाजित कुटुंबाच्या उत्पन्नाचा भाग म्हणून मान्य केले आहे, परंतु व्यवस्थापकीय संचालकांच्या मानधनाबद्दल तेच म्हटले जाऊ शकत नाही. व्यवस्थापकीय संचालक, संचालक मंडळाच्या ठरावानुसार पदभार स्वीकारतो. ते कंपनीचा कर्मचारी नसले तरीही त्यांना त्यांच्या वैयक्तिक सेवेसाठी पगार मिळतो. भांडवलात योगदान हे जास्तीत जास्त संचालकाची पात्रता प्राप्त करणे असे मानता येते. शेअर्स धारण करणारे सर्व लोक स्वयंचलनाने व्यवस्थापकीय संचालक बनण्याची आकांक्षा बाळगू शकत नाहीत. राजकुमार आणि राजबहादुर यांची कुटुंबाच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली किंवा संयुक्त कुटुंबाची मालमत्ता वापरून उत्पन्न मिळवले किंवा कौटुंबिक मालमत्तेचे नुकसान झाले होते हे दर्शविण्यासाठी कोणताही पुरावा नाही. या प्रकरणी असा कोणताही पुरावा नाही की व्यवसायाचे अधिग्रहण किंवा कंपनीची सक्रियता

आणि व्यवस्थापकीय संचालकांची नियुक्ती एकमेकांशी अविभाज्यपणे जोडलेली होती. पूर्वी नमूद केल्याप्रमाणे, सध्याच्या आकारणी वर्षाच्या संबंधित लेखा वर्षापर्यंत संबंधित उत्पन्न हे राजकुमारच्या व्यक्तीगत उत्पन्न म्हणून मानण्यात आले. हे खरे आहे की, निर्णीत बाब (Res Judicata) चा प्रश्न नाही, परंतु हा मुद्दा निश्चितच विचारात घ्यायला हवा. हे उत्पन्न कलम ७ अंतर्गत करयोग्य मानण्यात आले आहे. ते उत्पन्न राजकुमारने त्याच्या कामांमधून मिळविले आहे. ते त्याच्या हातात जमा झाले आहे. ते कुटुंबाला देणे त्याच्यासाठी खुले आहे आणि ते कुटुंबाच्या खात्यात किंवा ताळेबंदात समाविष्ट होते या केवळ गोष्टीमुळे कोणत्याही परिस्थितीत विचाराधीन मुद्द्यावर परिणाम होऊ शकत नाही. राजकुमारची कुटुंबाच्या मालमत्तेच्या परिव्ययामुळे, खर्चामुळे किंवा नुकसानीमुळे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली नाही. व्यवस्थापकीय संचालक हे वैयक्तिक जबाबदारी आणि क्षमतेचे काम होते आणि काही पात्रता शेअर्स आणि इतर शेअर्स हे हिंदू अविभाजित कुटुंबाची मालमत्ता होती या गोष्टीमुळे व्यवस्थापकीय संचालक या जबाबदार पदावर त्याची नियुक्ती करण्याचे एकमेव किंवा मुख्य कारण नव्हते. त्यामुळे आमचे स्पष्ट मत आहे की राजकुमारने प्राप्त केलेले मानधन हे केवळ त्यांच्या व्यक्तीगतरीत्या करयोग्य होते आणि हिंदू अविभाजित कुटुंबाच्या उत्पन्नात समाविष्ट करून विचारात घेता येत नाही.

उच्च न्यायालय मध्य प्रदेश, आयकर अपीलीय न्यायाधिकरणाने काढलेल्या निर्णयाशी सहमत नव्हते. या न्यायालयाने *आयुक्त आयकर, पश्चिम बंगाल विरुद्ध कालू बाबू लालचंद* ([1]) या प्रकरणातील निर्णयाच्या अनुषंगाने, त्यांच्याकडे संदर्भित केलेल्या प्रश्नाचे उत्तर महसूलाच्या बाजूने असायला पाहिजे असे वाटले.

---

1. ३७ आय टी आर १२३

या प्रकरणात निर्णयासाठी उद्भवणारा कायद्याचा मुद्दा हा या न्यायालयाच्या आणि विविध उच्च न्यायालयांच्या अनेक निर्णयांचा विषय आहे. परंतु तरीही हा कायदा वादाच्या पलीकडे निकाली निघाला असे म्हणता येणार नाही. या न्यायालयाच्या एका किंवा दुसऱ्या निर्णयापासून आधार घ्यायचा प्रयत्न करणाऱ्या दोन विरोधी दृष्टिकोनांचा उल्लेख आपण आता करू. १९२१ मध्ये *गोकुलचंद विरुद्ध हुकमचंद नाथमल* ([2])या प्रकरणात न्यायिक समितीने असा निर्णय दिला की, "संयुक्त कुटुंबाच्या निधीचा थेट वापर आणि सदस्यांना त्याच्या प्रयत्नांवर लाभ मिळविण्यास पात्र करणारा वापर यांच्यात कोणताही वैध फरक असू शकत नाही." ही निरीक्षणे करताना न्यायिक समिती काही प्राचीन हिंदू कायदा ग्रंथांनी मार्गदर्शित झाल्याचे दिसून येते. कायद्याचा हा दृष्टिकोन हिंदू समाजाच्या प्रगतीमध्ये गंभीर अडथळा बनला आहे. हे सर्वविदित आहे की गोकुल चंद([2]) यांच्या प्रकरणातील निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात सार्वजनिक असंतोष निर्माण झाला आणि केंद्रीय विधिमंडळाला हस्तक्षेप करून हिंदू विद्याधन अधिनियम, १९३० (१९३० चा ३०) हा अधिनियम अस्तित्वात आणला, ज्याने त्या निर्णयाचा परिणाम संपुष्टात आणला. मग *आयुक्त आयकर -विरुद्ध - कालू बाबू लालचंद* या प्रकरणात या न्यायालयाचा निर्णय आला. त्या प्रकरणातील तथ्यांवर, या न्यायालयाने असे मत व्यक्त केले की, रोहतगीने फर्मच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून मिळविलेले मानधन हे त्याच्या हिंदू अविभाजित कुटुंबाचे उत्पन्न आहे. त्या प्रकरणातील तथ्ये काहीशी वेगळी होती. ते अहवालात पान क्र. १३० वर नमूद केले आहेत. ते परिच्छेद येथे नमूद करणे चांगले ठरेल जे खालीलप्रमाणे:

> "येथे हिंदू अविभाजित कुटुंब होते ज्याचे बी.के. रोहतगी हे कर्ता होते. इंडिया इलेक्ट्रिक वर्क्स या नावाने मिलखी राम आणि इतरजणांनी चालवलेल्या उद्योगात या कुटुंबाचे स्वारस्य होते. कर्ता कंपनीच्या प्रवर्तकांपैकी एक होता जी त्याने इंडिया इलेक्ट्रिक वर्क्सचा ताबा घेण्याच्या उद्देशाने सुरू केली होती. त्या कंपनीच्या स्थापनेच्या अपेक्षेने कुटुंबातील कर्त्याने ही संस्था ताब्यात घेतली, ती

2. ४८ आय. ए. १६२

चालविली आणि संयुक्त कुटुंब निधीतून सर्व टप्प्यांवर वित्तपुरवठा केला आणि निष्कर्ष असा आहे की त्याने त्याच्या स्वतंत्र मालमत्तेतून काहीही योगदान दिले नाही, जर त्याच्याकडे काही असेल तर. कंपनीच्या संस्थापन नियमावलीत त्याच व्यक्तीची व्यवस्थापन संचालक म्हणून नियुक्ती करण्याची तरतूद होती, ज्याने कुटुंबाचा कर्ता म्हणून कंपनीला प्रोत्साहन दिले होते. व्यवसायाचे अधिग्रहण, कंपनीचा सक्रियता आणि व्यवस्थापन संचालकांची नियुक्ती हे एकमेकांशी अविभाज्यपणे जोडलेले असल्याचे आम्हाला वाटते. संयुक्त कुटुंब मालमत्तेचा वापर संस्थेचा ताबा मिळवण्यासाठी आणि त्यासाठी अर्थसहाय्य करण्यासाठी केला जात असे आणि संयुक्त कुटुंब मालमत्तांना होणाऱ्या सर्व नुकसानाच्या बदल्यात संयुक्त कुटुंबाला केवळ कुटुंबातील दोन सदस्यांच्या नावावर असलेले शेअर्सच मिळाले नाही, तर त्याच योजना भाग म्हणून, स्थापन झाल्यावर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालकपदही मिळाले. ही गोष्टही महत्त्वाची आहे की आकारणी वर्ष १९४३-४४ शी संबंधित लेखा वर्षापर्यंत, उत्पन्न हे हिंदू अविभाजित कुटुंबाच्या उत्पन्न आहे असे मानण्यात आले होते. हे खरे आहे की निर्णीत बाब (Res Judicata) चा प्रश्न नाही मोबदला कुटुंबाला देण्यात आला ही वस्तुस्थिती निश्चितच विचारात घेण्यासारखी आहे."

पुढे या न्यायालयाचा निर्णय *मथुराप्रसाद -विरुद्ध - आयकर आयुक्त* ([1])प्रकरणात आला. त्या प्रकरणात आढळलेली तथ्ये *कालू बाबू लाल चंद* ([2])प्रकरणात आढळलेल्या तथ्यांशी जवळपास सारखीच आहेत. ती तथ्ये अशी आहेत कि: मथुराप्रसाद, त्यांच्या हिंदू अविभाजित कुटुंबाचे व्यवस्थापक, कुटुंबाच्या फायद्यासाठी त्यांच्या कुटुंबाच्या कर्ता म्हणून प्रतिनिधित्व करत भागीदारीत प्रवेश केला होता.

1. ६० आय. टी. आर ४२८

2. ३७ आय. टी. आर १२३

बद्रीप्रसाद जगनप्रसाद या फर्ममध्ये करपात्र कुटुंबाची मालमत्ता होती याबाबतही कोणताही वाद नव्हता. न्यायाधिकारणाने असा निष्कर्ष काढला की व्यवस्थापक मथुराप्रसाद यांनी संयुक्त कुटुंबाच्या निधीच्या मदतीने फर्ममध्ये भागीदार झाले आणि भागीदार म्हणून त्यांना अग्रवाल आयर्न वर्क्सच्या व्यवस्थापनाची जबाबदारी देण्यात आली होती. या तथ्यांच्या आधारे असे ठरवण्यात आले की मथुराप्रसाद यांना मिळालेले उत्पन्न भागीदारी व्यवसायात कुटुंबाच्या निधीच्या गुंतवणुकीशी थेट संबंधित आहे. निर्णय देताना असे निरीक्षण करण्यात आले:

> "असे सुचविण्यात आले की मथुराप्रसाद यांनी अग्रवाल आयर्न वर्क्सच्या व्यवस्थापनासाठी त्यांच्याकडे असलेल्या विशेष क्षमतेमुळे कर आकारण्यात येणारे उत्पन्न मिळवले होते आणि त्यांनी दावा केलेले उत्पन्न संयुक्त कुटुंबाच्या निधीचा वापर करून मिळवले नाही. परंतु असा कोणताही युक्तिवाद उच्च न्यायालयासमोर उपस्थित करण्यात आला नव्हता. अधिनियमाच्या कलम ६६(२) अंतर्गत उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली याचिका आम्हाला दाखवण्यात आली आणि त्यात मथुराप्रसाद यांना अग्रवाल आयर्न वर्क्सच्या व्यवस्थापनासाठी कोणतीही विशेष योग्यता होती असा कोणताही उल्लेख नाही आणि त्यांना जे दिले जाण्यास सहमती झाली होती, ते अशा योग्यतेमुळे सेवा केल्याबद्दलचे मोबदले होते, असा कोणताही पुरावा नाही.

त्यानंतर आपण पियरे लाल आदिश्वर, लाल वि. आयकर आयुक्त ([1]) प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयाकडे येऊ : त्यात शील चंद्र, जे स्वतः आणि त्यांच्या धाकट्या भावाच्या हिंदू अविभाजित कुटुंबाचे कर्ता होते, त्यांनी बँकेचे कोषाध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यासाठी त्यांच्या कुटुंबाची मालमत्ता हमी म्हणून दिली. त्यांनी हमी दिली नसती तर त्यांची बँकेच्या कोषाध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली नसती.

---

1. ४० आय. टी. आर १७

त्या प्रकरणातही, आयकर आयुक्तांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला होता की शीलचंद्र यांनी मिळवलेले उत्पन्न हे कौटुंबिक उत्पन्न आहे आणि त्यावर कर आकारला जाऊ शकतो. हा युक्तिवाद या न्यायालयाने फेटाळून लावला. त्या निर्णयावरून असे दिसून येते की कौटुंबिक निधीतून मिळणारी कोणतीही आणि सर्व प्रकारची मदत उत्पन्नास कौटुंबिक उत्पन्न म्हणून मानले जात नाही. सहदायादाच्या परिश्रमातून मिळवलेले उत्पन्न हे कुटुंबाचे उत्पन्न मानण्यापूर्वी, विवादित उत्पन्न आणि कौटुंबिक निधी यांच्यातील थेट आणि लक्षणीय संबंध सिद्ध झाला पाहिजे.

२७ ऑक्टोबर १९६७ रोजी या न्यायालयाने *व्ही.डी. धनवते - विरुद्ध - आयकर आयुक्त, मध्यप्रदेश* ([2]), *एम.डी. धनवते विरुद्ध आयकर आयुक्त, मध्यप्रदेश* ([3]) आणि *एस. आर. एम. सी. टी. पी. एल. पलनियप्पा चेट्टियार विरुद्ध आयकर आयुक्त, मद्रास* ([4])असे तीन वेगवेगळे निर्णय दिले. *व्ही.डी. धनवते* यांच्या प्रकरणातील तथ्ये अशी आहेत कि: व्ही. डी. धनवते हे त्यांच्या हिंदू अविभाजित कुटुंबाचे कर्ता म्हणून एका फर्ममध्ये भागीदार होते. त्यांनी फर्मच्या भांडवलात केलेले योगदान हे कुटुंबाचे होते. प्रत्येकी भागीदारांनी दिलेल्या भांडवलावर फर्मकडून व्याज देय होते. भागीदारी करारच्या खंड (७) अंतर्गत भागीदारी व्यवसायाचे सर्वसाधारण व्यवस्थापन आणि देखरेख व्ही. डी. धानवते यांच्या हातात होते. खंड (१६) अंतर्गत त्यांना भागीदारी व्यवसायाच्या सकल कमाईवर मासिक मानधन देण्यात यायचे. प्रश्न असा होता की व्ही. डी. धानवते यांना मिळालेले मानधन त्यांच्या हिंदू अविभाजित कुटुंबाच्या खात्यात करयोग्य होता की नाही. वरील तथ्यांवर, उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की व्ही.डी. धानवते यांना देण्यात आलेले मानधन हे त्यांच्या हिंदू अविभाजित कुटुंबाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्ही.डी. धानवते यांना देण्यात आलेल्या फर्मच्या नफ्यातील

2. ६८ आय. टी. आर ३६५

3. ६८ आय. टी. आर ३८५

4. ६८ आय. टी. आर २२१

वाढलेला हिस्सा आहे आणि म्हणूनच सदर रक्कम त्याच्या अविभाजित कुटुंबाच्या खात्यात करयोग्य आहे. बहुसंख्य निर्णयाद्वारे या न्यायालयाने उच्च न्यायालयाने घेतलेल्या या भूमिकेशी सहमती दर्शविली. या न्यायालयाने असे ठरवले की फर्मने व्ही. डी. धानवते यांना दिलेले मानधन हे कुटुंबाच्या मालमत्तेतून भागीदारी व्यवसायातील गुंतवणुकीशी थेट संबंधित आहे आणि संयुक्त कुटुंबाच्या निधीतून केलेली गुंतवणूक आणि त्यांना दिलेल्या मानधनात वास्तविक आणि पुरेसा संबंध आहे. या आधारावर या न्यायालयाने असा निर्णय दिला की व्ही. डी. धानवते यांना दिलेले मानधन हे त्यांच्या हिंदू अविभाजित कुटुंबाच्या उत्पन्न म्हणून करयोग्य आहे.

एम. डी. धनवते ([1])यांच्या प्रकरणातील तथ्ये अशी आहेत की, एम. डी. धनवते हे त्यांच्या हिंदू अविभाजित कुटुंबाचे कर्ते म्हणून एका फर्ममध्ये भागीदार होते. फर्मच्या भांडवलात त्यांचा हिस्सा संपूर्णपणे कुटुंबाने दिला होता. भागीदारी करार खंड (५) अंतर्गत भागीदारांनी त्यांच्या भांडवलातील योगदानावर व्याज देण्याची तरतूद आहे. खंड (८) अंतर्गत ते कामाचे व्यवस्थापक असणार होते आणि खंड (१६) अंतर्गत त्यांना मासिक मानधन देण्यात येणार होते. त्यांना मिळालेला पगार त्यांच्या हिंदू अविभाजित कुटुंबाच्या एकूण उत्पन्नात समाविष्ट केला जाऊ शकतो का हा प्रश्न होता. या न्यायालयाने असा निर्णय दिला की त्यांना मिळालेला पगार त्यांच्या हिंदू अविभाजित कुटुंबाच्या एकूण उत्पन्नात समाविष्ट केला जाऊ शकतो.

पलनियप्पा चेट्टियार प्रकरणात ([2]), आढळलेली तथ्ये खालीलप्रमाणे आहेत कि:

१९३४ मध्ये, हिंदू अविभाजित कुटुंबाच्या कर्त्याने कुटुंबाच्या निधीतून परिवहन कंपनीतील ३०० पैकी ९० शेअर्स विकत घेतले. सुरुवातीला कर्त्यासह चार भागधारक होते आणि त्यापैकी दोघे संचालक होते. १९४१ मध्ये त्यापैकी एकाच्या मृत्यूनंतर, कर्ता कंपनीचे संचालक झाले. कंपनीचा व्यवसाय चालवणारा दुसऱ्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर,

1. ६८ आय. टी. आर ३८५

2. ६८ आय. टी. आर २२१

१९४२ मध्ये ते कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक झाले. संबंधित कालावधीत ते कंपनीच्या निव्वळ नफ्यावर पगार आणि दलाली मिळण्यास पात्र होता. व्यवस्थापकीय संचालकाचे कंपनीच्या आर्थिक आणि प्रशासकीय बाबींवर नियंत्रण होते आणि नियमावली अंतर्गत संचालकाची एकमेव पात्रता होती- ती म्हणजे त्याच्या स्वतःच्या हक्कात किमान २५ शेअर्स धारण करणे. प्रश्न असा होता की व्यवस्थापकीय संचालकाचे मानधन आणि उत्पन्न आणि कर्त्याला प्राप्त झालेला बैठक भत्ता कुटुंबाच्या उत्पन्न म्हणून आकारणीयोग्य आहे का. या न्यायालयाने असा निर्णय दिला की कर्त्याला व्यवस्थापकीय संचालक बनण्याच्या उद्देशाने कुटुंबाने शेअर्स विकत घेतले नाहीत तर गुंतवणुकीच्या सामान्य व्यवहारात घेतले आणि संयुक्त कुटुंबाच्या निधीची गुंतवणूक म्हणून शेअर्सची खरेदी आणि कर्त्याची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती यांच्यात कोणताही वास्तविक संबंध नव्हता. व्यवस्थापकीय संचालकाचे मानधन संयुक्त कुटुंबाच्या मालमत्तेचे नुकसान करून मिळवले गेले नाही. म्हणून व्यवस्थापकीय संचालकाचे मानधन, कमिशन आणि बैठक भत्ता म्हणून कर्त्याने प्राप्त केलेली रक्कम हिंदू अविभाजित कुटुंबाच्या उत्पन्न म्हणून आकारणीयोग्य नव्हती.

या न्यायालयाने पुढे ठरवलेले प्रकरण म्हणजे *आयुक्त आयकर, मैसूर – विरुद्ध - गुरुनाथ ढाकप्पा.*([1]) त्यात एका हिंदू अविभाजित कुटुंबाचा कर्ता त्याच्या कुटुंबाचे प्रतिनिधित्व करत एका नोंदणीकृत फर्ममध्ये भागीदार होता. त्याची फर्मचा व्यवस्थापक म्हणून नियुक्ती महिना ५००१/- रुपये मानधनावर झाली. आकलन वर्ष १९६०-६१ साठी, त्याला फर्मकडून १४,७३७/- रुपये रक्कम मिळाली, ज्यामध्ये ६,०००/- रुपये रक्कम फर्मचा व्यवसाय व्यवस्थापनासाठी त्याच्या पगारापोटी होती. कर्त्याला मिळालेला पगार कुटुंबाने फर्ममध्ये वापरलेल्या मालमत्तेशी थेट संबंधित होता असे कोणतेही निष्कर्ष नव्हते. या तथ्यांवर आधारित या न्यायालयाने असा निर्णय दिला की ६,०००/- रुपये रक्कम ही हिंदू अविभाजित कुटुंबाचे उत्पन्न म्हणून मानता

1. ७२ आय. टी. आर १९२

येणार नाही. निर्णय देताना या न्यायालयाने असे निरीक्षण केले कि:

> “ढाकप्पा यांना मिळालेले उत्पन्न भागीदारीत वापरलेल्या कुटुंबाच्या कोणत्याही मालमत्तेशी थेट संबंधित होते असा निष्कर्ष नसल्याने, उत्पन्नाला हिंदू अविभाजित कुटुंबाच्या उत्पन्न मानता येणार नाही.”

नंतर या न्यायालयाने *पी. एन. कृष्णा अय्यर -विरुद्ध - आयकर आयुक्त, केरळ* (2)प्रकरणात निर्णय दिला. त्यात, कृष्णा अय्यर, त्यांच्या हिंदू अविभाजित कुटुंबाचे कर्ता, परिवहन व्यवसाय करणाऱ्या खाजगी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून पगार, कमिशन आणि बैठक भत्ता मिळाले. कर्त्याला कंपनीचा सदस्य बनण्यास पात्र करून देणारे शेअर्स संयुक्त कुटुंबाच्या निधीच्या साहाय्याने खरेदी केले होते. कंपनीची संपूर्ण भांडवली मालमत्ता मूलतः संयुक्त कुटुंबाची होती आणि ज्या रकमेसाठी मालमत्तेचे मूल्य होते ती रक्कम देण्याचे केवळ वचन विचारात घेऊन ती कंपनीला उपलब्ध करून देण्यात आली होती. कंपनीने कर्त्याला त्याने केलेल्या अमूल्य सेवेच्या बदल्यात दिलेल्या ४,८८,०००/- रुपये मूल्याच्या शेअर्सचे लाभांश देखील कुटुंबाच्या मालकीचे मानले जात होते. न्यायाधिकारणाने असा निर्णय दिला की कर्त्याने कमावलेल्या पगार, कमिशन आणि बैठक शुल्क हे त्याचे स्वतंत्र उत्पन्न आहे. संदर्भित केल्यावर उच्च न्यायालयाने असे म्हटले की उत्पन्न हे कुटुंबाचे उत्पन्न म्हणून आकारणीयोग्य होते. अपील केल्यावर या न्यायालयाने असा निर्णय दिला की उत्पन्न हे हिंदू अविभाजित कुटुंबाचे उत्पन्न आहे की व्यक्तीचे हे कायद्याचा आणि तथ्याचा मिश्रित प्रश्न आहे आणि न्यायाधिकारणाने प्राथमिक साक्षीपुराव्याच्या तथ्यांवरून काढलेला अंतिम निष्कर्ष हा संबंधित तत्त्व न्यायाधिकारणाने चुकीचा वापर केला आहे अशी याचिका करून आव्हानित करू शकतो. प्रकरणातील तथ्यांवर या न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाची पुष्टी करत असा निर्णय दिला की उत्पन्न हे प्राथमिकरीत्या संयुक्त कुटुंबाची मालमत्ता किंवा निधी वापरून कमावले गेले आहे

---

2. ७३ अाय. टी. आर ५३९

आणि या प्रक्रियेत वैयक्तिक सेवा किंवा कौशल्य किंवा श्रम या घटकांचा समावेश असला तरी उत्पन्नाचा स्वरूप बदलत नाही. त्यात या न्यायालयाने पुढे असे निरीक्षण नोंदवले की या प्रकरणांमध्ये पावतीचे स्वरूप, तिच्या स्त्रोताच्या संदर्भात, ज्या कुटुंबाचा प्राप्तकर्ता सदस्य होता त्या कुटुंबाच्या मालमत्तेशी त्याचा संबंध आणि ज्या प्राथमिक उद्देशाने लाभ प्राप्त झाला होता, त्याचे वितरण केले गेले होते, त्यानुसार निश्चित केले गेले पाहिजे.

शेवटी आपण *आयकर आयुक्त,* म्हैसूर *विरुद्ध* डी. सी. शाह ([1]) प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयाकडे येतो. त्यात उत्तरवादी, एक हिंदू अविभाजित कुटुंबाचे कर्ता डी. सी. शाह यांच्यामार्फत दोन फर्ममध्ये भागीदार होते. कर्त्याला दोन्ही फर्मकडून व्यवस्थापकीय भागीदार म्हणून मानधन दिले होते. फर्म ज्या व्यवसायात आहे त्या व्यवसायात ते समृद्ध अनुभव असलेले व्यक्ती म्हणून आढळून आले. पहिल्या फर्मच्या भागीदारी कराराच्या खंड (८) मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, शाह यांनी फर्मचा व्यवसाय चालवला आहे आणि ते इतर भागीदारांच्या कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय सदर व्यवसाय चालवण्यासाठी व्यवस्थापकीय भागीदार म्हणून काम करत राहतील त्यासोबतच कोणत्याही कर्मचाऱ्याचे व्यवस्थापन, निर्देश, नियुक्ती आणि/किंवा काढून टाकण्याचा अधिकार राहील आणि/किंवा इतर सर्व गोष्टी ज्यामध्ये भागीदारी व्यवसायाच्या संदर्भात धनादेश काढण्याचा, कायदेशीर किंवा व्यावसायिक कागदपत्रे बनवण्याचा, वितरित करण्याचा आणि स्वीकारण्याचा अधिकार असेल. खंड (९) मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, शाह यांच्या संपूर्ण आयुष्यासाठी किंवा निवृत्तीपर्यंत, यापैकी जे आधी येईल तोपर्यंत ते व्यवस्थापकीय भागीदार राहतील. दुसरी फर्मच्या कराराच्या खंड (१४) मध्ये आणखी एक भागीदार, के, यांची व्यवस्थापकीय भागीदार म्हणून नियुक्ती करण्याची तरतूद आहे आणि व्यवस्थापकीय भागीदाराला दुसऱ्या फर्मच्या करारातील आहेत तशाच प्रकारचे अधिकार देण्यात आले. खंड (१५) मध्ये के. च्या निवृत्तीनंतर शाह यांच्या नियुक्तीची

---

1. ७३ आय. टी. आर ६९२

तरतूद करण्यात आली होती आणि शाह यांची नियुक्ती त्यांच्या निवृत्तीनंतर करण्यात आली होती. या फर्ममध्ये दुसऱ्या कोणत्याही भागीदाराला पगार देण्यात आला नव्हता. या तथ्यांवर या न्यायालयाने असा निर्णय दिला की संयुक्त कुटुंबाच्या निधीच्या गुंतवणुक आणि शाह यांना देण्यात आलेल्या मानधनात कोणताही वास्तविक किंवा पुरेसा संबंध नाही आणि आणि हे मानधन संयुक्त कुटुंबाच्या मालमत्तेला नुकसान करून कमावले गेले नाही आणि शाह यांना दोन फर्मच्या व्यवस्थापकीय भागीदार म्हणून मिळणारे मानधन त्यांच्या हिंदू अविभाजित कुटुंबाच्या उत्पन्न म्हणून आकारणीयोग्य नाही.

पहिल्या दृष्टीक्षेपात एका बाजूला कालू बाबूचे प्रकरण, मथुरा प्रसादचे प्रकरण, धनवतेचे दोन प्रकरण आणि कृष्ण अय्यरचे प्रकरण आणि दुसऱ्या बाजूला पलनियप्पा चेट्टियारचे प्रकरण, डाकप्पाचे प्रकरण डी. सी. शाह यांचे प्रकरण या दोन निर्णयांच्या विचारधारांमध्ये संघर्ष असल्याचे दिसून येते. निर्णयांच्या या दोन विचारधारांचे सीमांकन करणारी रेषा फार वेगळी नाही परंतु सखोल तपासणी केल्यावर ती अोळखता येऊ शकते. दिलेले उत्पन्न ते दिले जात असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीचे आहे की त्याच्या कुटुंबाचे आहे हे शोधण्यासाठी वरील निर्णयांमध्ये अनेक चाचण्या सांगितल्या आहेत, परंतु कालू बाबू प्रकरण वगळता त्यापैकी कोणत्याही निर्णयात गोकाल चंद प्रकरणात लॉर्ड सुमनर यांच्या निरीक्षणांचा संदर्भ नाही जे असे आहेत कि “नफा विभाज्य आहे की नाही हे विचारात घेताना, संयुक्त कुटुंबाच्या निधीचा थेट वापर आणि सदस्याला त्याच्या स्वतःच्या प्रयत्नांनी नफा मिळवण्यास पात्र करणारा वापर यांच्यात कोणताही वैध फरक नाही”. आमच्या मते, तो सिद्धांत आता वैध नाही. इतर चाचण्या अशा आहेत कि:

(१) हिंदू अविभाजित कुटुंबाच्या सहदायादाला मानधन म्हणून प्राप्त केलेल्या उत्पन्नाचा संयुक्त कुटुंबाच्या निधीच्या गुंतवणुकीशी काही वास्तविक संबंध होते की नाही;

(२) प्राप्त झालेले उत्पन्न कुटुंबाच्या मालमत्तेच्या वापराशी थेट संबंधित होते की नाही;

(३) उत्पन्न प्राप्तीच्या प्रक्रियेत कुटुंबाला कोणतेही नुकसान झाले का; आणि

(४) उत्पन्न कुटुंबाच्या निधीच्या साहाय्याने प्राप्त झाले का;

आमच्या मते, या सहाय्यक तत्त्वांवरून जे व्यापक तत्त्व समोर येते ते म्हणजे सहदायादाने प्राप्त केलेला मोबदला स्वरूपात नसला तरी तो व्यवसायात कुटुंबाच्या निधीच्या गुंतवणुकीमुळे कुटुंबाला केलेल्या परताव्याच्या पद्धतींपैकी एक होता किंवा वैयक्तिक सहदायादाने केलेल्या सेवांसाठी दिलेली भरपाई होती. जर ते पहिलेचे असेल तर ते हिंदू अविभाजित कुटुंबाचे उत्पन्न आहे परंतु जर ते दुसरे असेल तर ते वैयक्तिक समादायादाचे उत्पन्न आहे. जर उत्पन्न मूलतः गुंतवलेल्या निधींच्या परिणामस्वरूप कमावले गेले असेल तर समादायादाने काही सेवा दिली हे तथ्य प्राप्तीचे स्वरूप बदलणार नाही. परंतु दुसरीकडे जर ते समादायादाने केलेल्या सेवेसाठी मूलतः मोबदला असेल तर त्याच्या सेवेचा लाभ घेतला होता कारण तो त्या व्यवसायात निधी गुंतवणाऱ्या कुटुंबाचा सदस्य आहे किंवा त्याने कौटुंबिक निधीतून पात्रता शेअर मिळवले होते, त्यामुळे ती पावती म्हणजे हिंदू अविभाजित कुटुंबाचे उत्पन्न होणार नाही. या प्रकरणात न्यायाधिकारणाने आढळलेल्या तथ्यांशी वर नमूद केलेल्या चाचण्या लागू करताना, विचाराधीन उत्पन्न राजकुमारचे वैयक्तिक उत्पन्न होते याबद्दल शंका घेण्यासाठी कोणतीही जागा नाही. त्याच्या कुटुंबाने फर्ममध्ये मोठ्या प्रमाणात शेअर्स खरेदी केले या केवळ कारणास्तव ते फर्मचा व्यवस्थापकीय संचालक झाले नाही. संचालक मंडळाने त्यांची व्यवस्थापन संचालक म्हणून निवड केली. न्यायाधिकारणाने असा निष्कर्ष काढला आहे की त्याला त्याच्या वैयक्तिक सेवेसाठी पगार मिळाला. कुटुंबाच्या वतीने त्याची व्यवस्थापकीय संचालक म्हणून निवड झाली होती हे सांगण्यासाठी कोणताही पुरावा नाही. पूर्वी त्यांना मिळणारा पगार त्याच्या वैयक्तिक उत्पन्न म्हणून करयोग्य होता. अन्य व्यवस्थापकीय संचालकांना मिळणाऱ्या पगाराच्या बाबतीतही अशीच परिस्थिती होती. न्यायाधिकरणाने असा निष्कर्ष काढला आहे की त्याची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती कुटुंबाच्या मालमत्तेच्या कोणत्याही परिव्यय किंवा खर्चाचा किंवा हानीचा परिणाम म्हणून झाली नाही.

व्यवस्थापकीय संचालकपद हे वैयक्तिक जबाबदारी आणि क्षमतेचे एक काम आहे असा निष्कर्षही त्यांनी काढला आहे. या परिस्थितीत विचाराधीन उत्पन्न हे करदात्याचे उत्पन्न मानता येणार नाही असे न्यायाधिकरणाने काढलेल्या निष्कर्षांशी आम्ही सहमत आहोत. या कारणांमुळे विचाराधीन उत्पन्न हे करदात्याचे उत्पन्न मानता येईल असे उच्च न्यायालयाच्या निर्णयाशी आम्ही सहमत नाही आहोत.

म्हणून हे अपील मंजूर करण्यात आले आहे आणि उच्च न्यायालयाने त्याला संदर्भित केलेल्या प्रश्नाला दिलेल्या उत्तराऐवजी, आम्ही तो प्रश्न खालीलप्रमाणे उत्तरतो:

प्रकरणातील तथ्य आणि परिस्थिती विचारात घेता, राजकुमार सिंह यांना व्यवस्थापकीय संचालक म्हणून मिळालेले मानधन त्याच्या वैयक्तिक उत्पन्न म्हणून आकारणीयोग्य होते आणि नाही की त्याच्या हिंदू अविभाजित कुटुंबाच्या उत्पन्न म्हणून होते.

या न्यायालयात आणि उच्च न्यायालयात अपीलकर्त्याचा खर्च विभाग भरणार आहे. सुनिश्चित केलेले सुनावणी शुल्क.

अपील मंजूर.

<u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".